स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखे अंतर्गत मराठी विषयात पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा गोषवारा

संशोधनाचा विषय

" निवडक मराठी ग्रामीण कवितेतील स्त्री चित्रण''

(कालखंड १९९० ते २०१०)

संशोधक विद्यार्थी

सखाराम बाबाराव कदम,

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,

कै. रमेश वरपूडकर कला, वाणिज्य व विज्ञान

महाविद्यालय सोनपेठ, जि परभणी.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. दत्ता रुस्तुमराव शिंदे,

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,

संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय, परभणी

मार्च २०२२

प्रस्तावना:-

मराठी साहित्य परंपरेत कविता हा तरल जाणिवांना उजागर करणारा साहित्य प्रकार आहे. १९६० नंतर मराठी कवितेच्या प्रांतात ग्रामीण, दलित, व स्त्रीवादी हे प्रमुख विचारप्रवाह आपल्या अंगभूत सामर्थ्यानिशी दाखल झाले. रोमँटिसिझम चा अभाव, विद्रोह आणि वास्तवसन्मुखता या साठोत्तरी कवितेतील केंद्रवर्ती जाणिवा दिसून येतात. साठोत्तरी मराठी कविता ज्या पटावर उभी आहे त्या पटासंबंधाने अनेक विविध निरीक्षणे मांडता येतील. यापूर्वी प्रसिद्धी केंद्रे पुण्या-मुंबई पुरतीच सिमित होती. साठोत्तर कालखंडात ती महाराष्ट्रभर सर्वदूर पसरली. महाराष्ट्रा बाहेरीलही मराठीभाषक समाजात आणि अगदी तालुका, जिल्हा स्तरापर्यंत ही केंद्रे अस्तित्वात आली. काव्यसंग्रहाचे प्रकाशन, काव्यवाचनाचे कार्यक्रम, काव्य विषयक लेखन, कवितेलाच वाहिलेल्या नियतकालिकांचे संपादन इत्यादी पुण्या मुंबईबाहेर सर्वदूर होऊ लागले. अशा रीतीने १९६० नंतरच्या काळात मराठी कवितेचे एकूण स्वरूपच बदलल्याचे दिसते.

ही पार्श्वभूमी असतानाच लक्षात घेण्यासारखी दुसरी गोष्ट म्हणजे या काळात समाजाच्या विविध स्तरातून सशक्त कवी पुढे आले. परिणामी कविता ही केवळ उच्चवर्णीय, मध्यमवर्गीय संवेदनेची, जाणिवेची राहिली नाही. मराठी कवितेचा संवेदन प्रदेश विस्तारला गेला आहे. ग्रामीण, दलित वस्ती, वाडी तांडा या प्रत्येक प्रवाहातील नवे नवे कवी हेरण्यात प्रकाशन संस्थाही आता पुढाकार घेऊ लागल्या.

१९९० ते २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कवितेने हा सुरुवातीचा टप्पा ओलांडला. या दोन दशकातील ग्रामीण कवितेत खेडे, खेड्यातील समाजवास्तव, राजकारण, गाव खेड्या वरील यंत्रसंस्कृतीचे, शहरीकरणाचे होणारे आक्रमण, विविध प्रथा परंपरा कडे पाहण्याचा बदलता ग्रामीण युवकांचा दृष्टीकोण, शेतकी शिक्षणाच्या प्रगतीने शेती करण्याच्या पद्धत्तीतील नवनवे प्रयोग, सण समारंभ, जत्रा यात्रा यांचे महत्त्व कमी होऊन सिनेमा व दूरदर्शन कडे वळलेला बहुतांश समाज, स्त्रियांच्या स्वतंत्र व्यक्तित्वाचा सुरू झालेला विचार, संयुक्त कुटुंब पद्धतीला गेलेले तडे व माणसांची विभक्त राहण्याची मानसिकता. या समग्र जाणिवा सलगपणे या दोन दशकातील कवितेतून येताना दिसतात.

१९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेच्या जाणिवांची केंद्रे ग्रामजीवन, कृषीसंस्कृती, बदलते खेडे , स्त्री, गावखेड्यातील कुरघोडी राजकारणाचा गावावरील, गावकऱ्यांच्या मानसिकतेतील बदल अशी भिन्न असलेली दिसतात. यापैकी प्रस्तुत संशोधनामध्ये १९९० ते २०१०या कालखंडातील मराठी ग्रामीण कवितेतील निवडक काव्यसंग्रहातून येणाऱ्या स्त्री चित्रणाचा अभ्यास करावयाचा आहे. या टप्प्यातील विविध ग्रामीण कवी, कवयित्री यांच्या स्त्री चित्रणातून

साम्यभेद, कुटुंब रचनेतील तिचे स्थान, तिच्या वाढत्या जबाबदाऱ्या, तिच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन, या पूर्वीच्या स्त्री चित्रणापेक्षा प्रस्तुत कालखंडातील स्त्री चित्रणाचे निराळेपण. त्या पाठीमागच्या प्रेरणा, प्रवृत्ती, सामर्थ्य स्थळे व स्थाननिश्चिती आदी बाबींचा अभ्यास होणे अभिप्रेत आहे.

१९९० ते २०१० या दोन दशकातील मराठी ग्रामीण कवितेचा विचार करताना एक गोष्ट नोंदवावीशी वाटते. १९९० नंतर काव्यलेखन करू लागलेली अगोदरच्या कालखंडातील ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ, नारायण कुलकर्णी कवठेकर, नारायण सुमंत यांचे नव्वद नंतरच्या कालखंडातही सशक्त कवितासंग्रह आले आहेत. तर श्रीकांत देशमुख, केशव सखाराम देशमुख, जगदीश कदम, जयराम खेडेकर, इंद्रजीत भालेराव (पिकपाणी वगळता), कैलास दौंड यांचे जवळपास संपूर्ण कविता संग्रह या काळातील आहेत. या शिवाय नव्याने दमदार ग्रामवास्तव आपल्या कवितेतून मांडणारे एकनाथ पाटील, प्रकाश किनगावकर, संतोष पद्माकर पवार, प्रदीप पाटील, बालाजी मदन इंगळे, लक्ष्मण महाडिक, संदीप जगताप, सुरेश शिंदे, रमेश चिल्ले आणि यांना समकालीन असलेले महाराष्ट्रातील विविध ग्रामीण कवी व त्यांच्या निवडक ग्रामीण काव्यसंग्रहातील स्त्री चित्रणाचा या संशोधनातून अभ्यास केला जाईल.

<u>अभ्यास विषयाचे महत्त्वः-</u>

१९९० ते २०१० या दोन दशकातील मराठी ग्रामीण कवितेत गाव, शेत, परिसर, तेथील निसर्ग, शेतकरी, स्त्री व लोकसंस्कृती... आदीं चे संदर्भ प्रामुख्याने येताना दिसतात. आजवर १९८० पर्यंतच्या मराठी ग्रामीण कवितेतील ग्रामजीवन, कृषीसंस्कृती व स्त्री या अंगाने संशोधन झाले आहे. या मराठी ग्रामीण कवितेतील पुढील दोन दशकाच्या स्त्री चित्रणाचा मी निवडक काव्यसंग्रहाच्या आधारे अभ्यास करणार आहे. १९९० नंतरच्या ग्रामीण कवितेतील स्त्री चित्रण संदर्भात हा अभ्यास दिशादर्शक व मौलिक ठरण्याची शक्यता आहे.

<u>संशोधनाची उद्दिष्टेः-</u>

प्रस्तुत अभ्यास विषयांमध्ये निवडक मराठी ग्रामीण कविता संग्रहाचा स्त्री चित्रणाच्या अंगाने अभ्यास करताना पुढील उद्दिष्टे समोर ठेवली आहेत.

1. निवडक ग्रामीण कवितेतील स्त्री जीवनाचे यथार्थ चित्रण करणे.
2. मातृत्वाचे वर्णन व स्त्रीत्वाचे वेगळेपण स्पष्ट करणे.
3. विविध नातेसंबंध जपणारी व नैतिक मूल्यांवर निष्ठा, श्रद्धा व्यक्त करणारी स्त्री अभ्यासणे.
4. कुटुंब रचनेतील व समाजातील स्त्रीचे स्थान अभ्यासणे.
5. कृषी संस्कृती व रूढी परंपरेचा स्त्री चित्रणावर होणारा परिणाम अभ्यासणे.

6. भारतीय समाज व पुरुषांचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन अभ्यासणे.

एकंदर आजच्या मराठी कवितेतील स्त्री जाणिवांचे व चित्रणाचे काही निष्कर्ष नोंदविण्याचा प्रयत्न करणे हा या संशोधनाचा हेतू आहे.

<u>संशोधन विषयाची गृहीतके:-</u>

१९९० ते २०१०या कालखंडातील मराठी ग्रामीण कवितेचा स्त्री चित्रणाच्या अंगाने अभ्यास करताना पुढील गृहीतक समोर ठेवले आहे. या निवडक काव्यसंग्रहातील स्त्रिया आपल्या भावविश्वाला सांभाळून नातेसंबंधातील प्रेम व आपुलकी जपताना दिसून येतात. सतत काबाडकष्ट करावे लागत असूनही ही स्त्री मनाने खंबीर आहे. शिक्षणामुळे कुटुंब रचनेतील तिचे स्थान व भूमिका बदलत आहेत. निसर्ग व प्राणिमात्रांची जवळीक असल्याने तिच्या मनातील सुप्त भावना व त्यांची अभिव्यक्ती ही समांतर ठरू पाहते. स्त्रियांच्या राजकारणातील सहभागामुळे अनेक वेळा पुरुषांच्या भूमिकेत बदल दिसून येतो. अनेक वेळा पुरुषसत्ताक मानसिकता ही स्त्री विकासाच्या आड येणारा अडथळा ठरताना दिसते. काहीवेळा गाव खेड्यातील सुशिक्षित स्त्री नोकरी व कुटुंब सांभाळतांना ओढाताण सहन करणारी असते. शहर व गाव यातील अंतराकडे ती कशी बघते. या गृहीतकांना अनुसरून संशोधन पुढे जाणार आहे.

<u>संशोधन पद्धती व प्रबंध विषयाची साधने:-</u>

१९९० ते २०१०या वीस वर्षाच्या कालखंडातील मराठी ग्रामीण कवितेतील स्त्री चित्रणाचा अभ्यास करताना गरजेनुसार विश्लेषण, संश्लेषण, तुलना, नमुना निवड आदी संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.

या संशोधनात प्राथमिक साधने म्हणून निवडक ग्रामीण कवींचे मूळ कविता संग्रह वापरण्यात येतील.

प्रस्तुत शोधप्रबंध लेखनासाठी विविध समीक्षकांचे समीक्षाग्रंथ, नियतकालिकांचे विशेषांक, विविध नियतकालिके, मासिक, साप्ताहिके, दैनिक वृत्तपत्रे, विशेष पुरवण्या, ग्रंथ परिक्षणे, मुलाखत व कवींशी वेळोवेळी केलेल्या चर्चा यांचाही वापर करण्यात येईल. या शिवाय मराठी विकिपीडिया, E-Resources, Blog's, YouTube channel यांचाही आवश्यकतेनुसार वापर करण्यात येईल.

<u>संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:-</u>

आधुनिक मराठी कवितेला प्रदीर्घ अशी परंपरा आहे. आणि त्यामध्ये विशेषतः मराठी ग्रामीण कवितेचे दालन समृद्ध असल्याचे पाहायला मिळते.

प्रस्तुत संशोधनात १९९० ते २०१० या कालखंडातील मराठी ग्रामीण कविता विचारात घेतली आहे. प्रस्तुत संशोधनात एकाही स्त्री कवयित्रीच्या काव्यसंग्रहाचा विचार केला जाणार नाही.

त्यातही हा अभ्यास स्त्री चित्रणाच्या अंगानेच केला जाणार आहे.

दोन दशकांचा हा आवाका फार मोठा असल्यामुळे काही निवडक ग्रामीण काव्यसंग्रहाचाच विचार येथे करावा लागतो.. काव्यसंग्रहाची निवड करताना यादृच्छिक पद्धतीने करण्यात येईल ती अगदी काटेकोर असणार नाही.

अभ्यासाच्या दृष्टीने शोधप्रबंधांची मांडणी व्हावी म्हणून पुढील प्रकरणात विभागणी केली जाईल.

<u>प्रकरण पहिले:- मराठी ग्रामीण कवितेची पूर्व परंपरा</u>

_मराठी ग्रामीण कवितेचा आत्तापर्यंतचा एकूण पट या प्रकरणात मांडण्यात येईल. यावरून मराठीतील ग्रामीण कवितेचे बदलत गेलेले स्वरूप, ग्रामीण कवितेचा विकास स्पष्ट करणे सोपे होईल १९६० नंतरच्या काळात लिहिल्या गेलेल्या मराठी ग्रामीण कवितेतील जीवन जाणीव, संवेदना स्वर, अधिक ठळक होण्यास मदत होईल.

<u>प्रकरण दुसरे: १९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेचे स्वरूप</u>

ग्रामीण कवितेच्या सुरुवातीच्या काळापासून ते १९९० पर्यंत या कवितेने अनेक वळणे, बदल आपल्यात सामावून घेतले आहेत. त्यांचा आशय विषय तत्कालीन आहे.१९९० नंतर च्या कवितेवर पूर्व परंपरेचा प्रभाव काही अंशी असला तरीही नव्वदीनंतरची कविता बरीचशी बदललेली दिसते. काही नवीन विषय तिच्या केंद्रवर्ती राहिलेले आहेत. जागतिकीकरणाचा परिणाम ग्रामीण जीवनावरही झालेला येथे प्रकर्षाने दिसतो. त्याचे चित्रण या कवितेत आलेले आहे. इंद्रजीत भालेराव, ना. धों. महानोर, श्रीकांत देशमुख, संतोष पद्माकर पवार, अजय कांडर, प्रकाश किनगावकर.... इत्यादी काही कवींच्या कवितेत हे स्वरूप दिसते. त्यामुळे या ग्रामीण कवितेचे स्वरूप, समाजवास्तव, प्रतिमासृष्टी, वाड.मयीन दृष्टीकोन व प्रभाव आदी बाबींचा अभ्यास करणे या प्रकरणात अभिप्रेत आहे.

<u>प्रकरण तिसरे: मराठी ग्रामीण कविता : कुटुंबरचना आणि स्त्री</u>

भारतीय कृषीसंस्कृती मध्ये एकत्र कुटुंब पद्धती प्रचलित होती. आज काळानुरूप विभक्त कुटुंब पद्धती वाढत आहे. कुटुंब व्यवस्थेचे झालेले हे विखंडन याकडे ग्रामीण कविता कशी बघते? शेतीच्या कामामध्ये पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून बरोबरीचे कष्ट करणारी स्त्री, पारंपारिकतेचा तिच्या मनावरील पगडा, आर्थिक व्यवहाराशी किंवा मुख्य निर्णय प्रक्रियेशी तिचा फारसा संबंध नसायचा. कौटुंबिक नातेसंबंध जोपासण्यामध्ये, सगळयांची मन सांभाळण्यामध्ये, सणवार, व्रतवैकल्य करण्यामध्ये ती खपत राहायची. आज मात्र यामध्ये फरक दिसतो. परंतु काळ बदलला तरीही बरेच जुने दुखणे नव्या पद्धतीने तिच्या समोर आले आहे. आजचे बदलते समाजवास्तव व त्याचा स्त्रीवर होणारा परिणाम, तिच्या मनाची होणारी कुचंबना इत्यादी चे चित्रण यादृष्टीने या प्रकरणात मांडणी केली जाईल. या संपूर्ण स्त्री चित्रणात कृषिसंस्कृतीचा पडलेला प्रभाव स्पष्ट करण्यात येईल.

<u>प्रकरण चौथे: मराठी ग्रामीण कवितेतील स्त्री जाणिवा व त्यांचे निराळेपण</u>

या कालखंडातील स्त्री जाणिवा मध्ये नेमक्या कोणत्या जाणिवा तिच्या म्हणून खास पाहिल्या जातात. सामाजिक जीवनामध्ये स्त्री म्हणून तिचे स्थान काय आहे? तिची कशी घुसमट होते? याचे चित्रण आजच्या ग्रामीण कवितेत आलेले आहे. बदलत्या कौटुंबिक रचनेत आजच्या स्त्रीचे संबंध कसे आहेत याचा अभ्यास या प्रकरणात अभिप्रेत आहे.

आधुनिक मराठी कवितेतील स्त्री चित्रणापेक्षा १९९० नंतरचे स्त्रीचित्रण अनेक दृष्टींनी भिन्न दिसते. दलित कवितेतील स्त्री पेक्षा नव्वद नंतरच्या ग्रामीण कवितेतील स्त्रीचे वेगळेपण तौलनिक अंगाने अभ्यासले जाईल. स्त्रीवादी चित्रणापेक्षा ग्रामीण कवितेतील स्त्री चित्रणाच वेगळेपणही येथेच नमूद करण्यात येईल. आत्तापर्यंतच्या ग्रामीण स्त्री चित्रणापेक्षा १९९० नंतरच्या ग्रामीण कवितेतील स्त्री चित्रणाचे निराळेपण येथे स्पष्ट करण्यात येईल.

प्रकरण पाचवे: मराठी ग्रामीण कविता : परंपरा, वस्तुस्थिती आणि स्त्री

या प्रकरणात प्रारंभ काळातील जानपद टप्प्यामध्ये आलेले स्त्री चित्रण, बहिणाबाईंच्या कवितेतील कष्टकरी स्त्रीचे वास्तव चित्रण, साठोत्तर काळातील आनंद यादव, विठ्ठल वाघ, महानोर यांच्या कवितेत येणाऱ्या स्त्रीची विविध रूपे, निसर्ग प्रतिमांशी, कृषीकर्माशी केलेली त्याची तुलना व १९९० नंतर बदललेल्या काळातील ग्रामीण जीवनाशी तिचे एकरूप होणे तरीही वेगळे ठरणे या बाबींचा अभ्यास येथे करायचा आहे.

प्रकरण सहावे: निष्कर्ष व समारोप

या शेवटच्या प्रकरणात एकूण संशोधनासंबंधी चे मूल्यमापन अभिप्रेत आहे. प्रकरणानुसार मांडलेल्या विश्लेषणाचे सार उपसंहारात मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात येईल. एकंदरीत संशोधनातून निघालेले निष्कर्ष गृहीतकांच्या या कसोटीवर तपासून मांडण्यात येणार आहेत.

संदर्भसूची:

1. यादव, आनंद : ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे प्रथमावृत्ती १९७९.
2. यादव, आनंद : ग्रामीणता: साहित्य आणि वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८१.
3. नलगे, चंद्रकुमार (संपा.): ग्रामीण वाङ्.मयाचा इतिहास, सुरेश एजन्सी पुणे, प्रथमावृत्ती १९९६.
4. सार्वेकर, कैलास : मराठी ग्रामीण कवितेचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्रथमावृत्ती १९९९.
5. काळे, अक्षयकुमार : अर्वाचीन मराठी काव्यदर्शन, पा.ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती १९९९.
6. गायकवाड, हेमलता : आधुनिक मराठी ग्रामीण कविता, फडके प्रकाशन, कोल्हापूर. प्रथमावृत्ती १९९७.
7. रसाळ, सुधीर : कविता आणि प्रतिमा, मौज प्रकाशन मुंबई, पहिली आवृत्ती 2002.
8. कोत्तापल्ले, नागनाथ : मराठी कविता: आकलन आणि आस्वाद, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.
9. डॉ. ठाकूर, रवींद्र : साहित्य समीक्षा आणि संवाद,
10. डॉ. हेगे, नागनाथ : साहित्य शोध आणि आस्वाद
11. शेलार, सुधाकर : ग्रामीण साहित्य चळवळीचे सामाजिक व सांस्कृतिक योगदान, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. प्रथम आवृत्ती १९७४.
12. मुलाटे, वासुदेव : ग्रामीण साहित्य चिंतन आणि चर्चा, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. प्रथमावृत्ती २००५.

13. लांडे, सुमती (संपा.) : वाङ्.मयीन चळवळी आणि दृष्टिकोन, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर. पहिली आवृत्ती २००८
14. बांदेकर, प्रवीण : समकालीन कविता: काही निरीक्षणे, उद्याचा मराठवाडा, दीपरंग २०१०, नांदेड.
15. जाधव, जयद्रथ (संपा.) : १९९१ नंतरचे ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि संदर्भ, संस्कार प्रकाशन, लातूर. प्रथमावृत्ति २०१०
16. जाखडे, अरुण(संपा.) : पद्मगंधा, दिवाळी २०१४.
17. गजेंद्रगडकर, वर्षा : स्त्री आणि पर्यावरण, पद्मगंधा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती २०१३.
18. भोसले, द.त्ता. : बदलते खेडे : काही निरीक्षणे, सत्याग्रही विचारधारा, दिवाळी २०१०.
19. कॉ. सोनवणे, विलास : बहुजन स्त्रीवादाच्या दिशेने, हर्मिस प्रकाशन.
20. भवाळकर, तारा : बाई, पाणी आणि अजय कांडरची कविता, साक्षात दिवाळी २००८.
21. पाटील, वसंत : १९९० नंतरची मराठी ग्रामीण कविता : वास्तव आणि बदलते संदर्भ, अक्षर वाङ्मय, जून-जुलै, ऑगस्ट २०१०

संशोधनासाठी निवडलेले कवितासंग्रह

1. ना धों महानोर : प्रार्थना दयाघना, तिची कहाणी
2. विठ्ठल वाघ : काया मातीत मातीत
3. श्रीकांत देशमुख: बळीवंत, आषाढमाती
4. जगदीश कदम : रास आणि गोंडर, झाडमाती, नामदेव शेतकरी
5. इंद्रजीत भालेराव : आम्ही काबाडाचे धनी, दूर राहिला गाव, पेरा, टाहो. वेचलेल्या कविता
6. प्रकाश किनगावकर : गावाच्या आकाभोवती
7. प्रकाश होळकर : कोरडे नक्षत्र
8. कैलास दौंड : भोग सरू दे उन्हाचा
9. प्रदीप पाटील : आत्मसंवाद, अंतरीचा भेद
10. जयराम खेडेकर : ऋतूवंत, मेघवृष्टी, भुई
11. संतोष पद्माकर पवार : भ्रमिष्टाचा जाहीरनामा, पीढीपेस्तर प्यादेमात
12. केशव सखाराम देशमुख : पाढा, चालणारे अनवाणी पाय, अथक
13. शशिकांत शिंदे : शरणागताचे स्तोत्र
14. सदानंद देशमुख : गावकळा
15. नारायण सुमंत : रानभैरी, सातबारा
16. लक्ष्मण महाडिक : कुणब्याची कविता
17. श्रीराम गोविंद गव्हाणे : होऊ दे रे आबादानी
18. एकनाथ पाटील : खुंट्यावर टांगलेली दुःख
19. रमेश चिल्ले : ओस झाल्या दिशा, नांगरून पडलेलं शतक
20. उत्तम कोळगावकर : तळपाणी
21. ललित अधाने : कुणबी बाप
22. शंकर वाडेवाले : माती बोले गुज
23. सुरेश शिंदे : काटेवन, पुस्तकात नसलेली पान
24. अजय कांडर : आवानओल
25. अशोक कौतिक कोळी : गावाकडल्या कविता

26. बालाजी मदन इंगळे : मेलं नाही अजून आभाळ
27. महेश मोरे : शिवार, हिरवे रान, पाऊसकाळ
28. संदीप जगताप : भुईभोग

संशोधक विद्यार्थी	मार्गदर्शक
सखाराम बाबाराव कदम,	प्रा. डॉ. दत्ता रुस्तुमराव शिंदे,
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,	सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
कै. रमेश वरपूडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी	संत तुकाराम कला व विज्ञान महाविद्यालय, परभणी